# मूग, उडिदच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांनो केंद्रावर ऑनलाईन नोंदणी करा

## पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांचे आवाहन

■ **मुंबई**

हंगाम २०२०-२१मधील किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत हमी भावाने मूग व उडीद खरेदीसाठीची नोंदणी उद्या १५ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

केंद्र शासनाने प्रती क्विंटलप्रमाणे उडीदासाठी हमी भाव ६ हजार, मूग हमी भाव ७ हजार १९६ असा जाहीर केला आहे. चालू हंगामात मूग, उडीदाची आवक बाजारात सुरु झाली आहे. बाजारभाव हमीभावापेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी खरेदी केंद्र लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. खरेदी केंद्रावर होणारी गर्दी टाळण्यासाठी उद्यापासून नोंदणी प्रक्रिया सुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना नोंदणीच्या क्रमवारीनुसार उडीद, मूग खरेदी केंद्रावर आणण्यासाठी एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. ज्या केंद्रावर नोंदणी केली आहे, त्याच केंद्रावर एसएमएस आल्यानंतरच शेतकऱ्यांनी शेतमाल घेऊन यावा. सर्व खरेदी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. शेतकऱ्यांनी आपआपल्या तालुक्यातील खरेदी केंद्रावर नोंदणी करावी. नोंदणीकरिता आधारकार्डाची छायांकित प्रत आणि पिकाची नोंद असलेला सातबारा उतारा सादर करावा. तसेच शेतकऱ्यांनी मोबाईल नंबर खरेदी केंद्रावर नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले.

केंद्र शासनाकडे हमीभावाने मूग, उडीद खरेदीच्या मान्यतेचा प्रस्ताव ३१ ऑगस्ट २०२० ला पाठविण्यात आला आहे. लवकरच मान्यता अपेक्षित आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# वालीव प्रभागातील अवैध पाणीविक्रेत्यांना महापालिकेचा दणका

**सुधीर भोईर**

■ **वसई**

वसई तालुक्यात अवैध पाण्याची विक्री करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ मांडणाऱ्या अवैध पाणी विक्रेत्यांना वसई-विरार शहर महानगरपालिकेने कारवाईचा दणका दिला आहे. वसई पूर्वेतील दोन अवैध पाणी प्लान्ट सील करून संबंधित पाणी विक्रेत्यांवर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. महापालिकेने केलेल्या कारवाईनंतर अवैध पाणी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. कोरोना काळात दर्जेदार बिस्लेरी कंपनीच्या जारमध्ये अशुद्ध पाणी भरून ते नागरिकांना विकण्याचा प्रताप या पाणी विक्रेत्यांनी हाती घेतला आहे. महापालिकेच्या वालीव विभागाचे प्र.सहआयुक्त सुरेंद्र पाटील यांनी आरोग्य विभागाचे अधिकारी सुखदेव दरवेशी यांना कारवाईच्या सूचना दिल्यानंतर सुखदेव दरवेशी यांनी आपल्या पथकासह सदर अनधिकृत पाणी प्लान्टवर

## प्र.सहआयुक्त सुरेंद्र पाटील इन 'ॲक्शन' दोन अवैध पाणी प्लान्ट सील; पाणी विक्रेत्यांचे धाबे दणाणले



कारवाई केली. सध्यस्थितीत जुंचद्र येथील महालक्ष्मी व बापाणे येथील एका अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करून ते सील करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वसई पूर्वेतील राजावली, टिवरी, जुचंद्र, चंद्रपाडा, वाकीपाडा, बापाणे, चिंचोटी, सातिवली आदि भागात बेकायदेशीर पाण्याचे प्लान्ट आहेत. महापालिकेच्या वालीव विभागाने दोन अवैध पाण्याचे प्लान्ट सील केल्यानंतर इतर पाणी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. अन्न व औषध प्रशासनाची तथा महापालिका प्रशासनाची कोणतीही परवानगी प्राप्त न करताच अवैध पाणी प्लान्ट उभारून त्याद्वारे अशुद्ध, प्रक्रिया न केलेले पाणी नागरिकांना पुरवठा केला जाते. सध्याच्या कोरोना काळात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न चव्हाट्यावर आला असताना अवैध पाणी विक्रेते मात्र वाहत्या गंगेत हात धुण्याचा प्रताप करत सुटलेत. पावसाळ्यात साथीच्या रोगांचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. अशावेळी अशुद्ध पाण्याचा पुरवठा करणाऱ्या पाणी विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करण्याच्या तक्रारी वालीव विभागाचे प्र.सहआयुक्त सुरेंद्र पाटील यांच्याकडे आल्या होत्या. तक्रारी प्राप्त होताच सुरेंद्र पाटील यांनी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. वसई पूर्व भागात ठाण मांडून बसलेल्या बऱ्याचशा अवैध पाणी विक्रेत्यांकडे कोणताही परवाना तसेच त्यांच्या व्यवसायाचे साधे रजिस्ट्रेशन नाही. सध्यसिस्थितीत या विभागात सुमारे २९ बेकायदेशीर पाण्याचे अवैध प्लांट सुरू आहेत. या सर्व अवैध पाणी प्लान्टवर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य अधिकारी सुखदेव दरवेशी यांनी बोलताना दिली.

# भीमा कोरेगाव दंगलीची एसआयटीमार्फत चौकशी करा व कबीर कला मंचच्या कार्यकर्त्यांची सुटका करा

## पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

■ **पुणे**

भीमा कोरेगाव दंगलीस जबाबदार धरून बेकायदेशीररित्या अटक केलेल्या कबीर कला मंचचे शाहीर सागर गोरखे ज्योती जगताप रमेश गायचोर यांची तत्काळ सुटका करावी व सदर दंगलीस जबाबदार असणाऱ्या मनोहर भिडे आणि मिलिंद एकबोटे या खऱ्या आरोपींना तत्काळ अटक करावी.

या मागणीसाठी काल पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. भीमा कोरेगाव प्रकरणात यापूर्वी अटक केलेल्या सर्व मानवाधिकार कार्यकर्ते, विचारवंत,वकील आणि कलाकार यांची बिनशर्त सुटका करण्यात यावी.

भीमा कोरेगाव प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी राज्य सरकारच्या अखत्यारीत एस.आई.टी.ची तत्काळ स्थापना करण्यात यावी. याही मागण्या यावेळी निदर्शकांनी केल्या. या निदर्शनात मूलनिवासी मुस्लीम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार, स्वराज अभियान, इब्राहिम खान, रिपब्लिकन भारतचे आकाश साबळे, अखिल महाराष्ट्र कामगार संघटनेचे किशोर कांबळे, सिद्धार्थ दिवे, कबीर कला मंचचे रामदास उन्हाळे, भीमशाही युवा संघाचे नितीन गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शाहरुख खान, असलम बागवान, राज फैय्याज, ॲड. क्रांती सहाने, ॲड. तैसीफ शेख, क्रांतिसूर्य संघटनेचे शुभम जगताप, नितीन जगताप, अक्षय साळवे, विशाल भालेराव सहित शेकडो कार्यकर्त्यांनी या अटकेच्या विरोधात केलेल्या निदर्शनात सहभाग घेतला.

# कांदा निर्यात बंदीचा निर्णय तातडीने मागे घ्या - छगन भुजबळ

## कांदा निर्यात बंदीचा निर्णय मागे घेण्याबाबत छगन भुजबळ यांची पक्षप्रमुख खासदार शरद पवार यांच्याशी चर्चा

■ **मुंबई**

केंद्र सरकारने अचानक कांदा निर्यातबंदी लागू केल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्याचबरोबर हजारो क्विंटल कांदा मुंबई बंदरात अडकला असून त्याची निर्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी यासंदर्भात पक्षप्रमुख खासदार शरदचंद्र पवार यांच्याशी चर्चा करण्यात आली असून कांदा निर्यात बंदी तातडीने हटवावी यासाठी केंद्र सरकारकडे ते स्वत: प्रयत्न करणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

देशात आणि राज्यात कोरोनाचे संकट ओढवल्यानंतर आता कुठेतरी बाजार सुरळीत होत होते. त्यातून अत्यंत कष्टाने पिकविलेल्या कांद्याला चांगला भाव मिळत असतांना केंद्र शासनाने अचानकपणे कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. एकीकडे चाळीमध्ये साठविलेला कांदा खराब होत आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठा तोटा होत असतांना कांदा निर्यात बंदीच्या निर्णयाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अधिक फटका बसत आहे.

याबाबत छगन भुजबळ यांनी पक्षप्रमुख खासदार शरदचंद्र पवार यांच्याशी सविस्तर चर्चा केली असून केंद्र सरकारकडे बाजू मांडली जाणार आहे.

त्यानुसार केंद्र सरकारबरोबर स्वत: शरद पवार साहेब हे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने स्वत: मध्यस्ती करत असून तातडीने कांदा निर्यात बंदी मागे घेण्याबाबत केंद्र सरकारसोबत चर्चा करणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी संयम ठेवावा असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे.

# घरगुती कामगार कल्याण मंडळाला १०० कोटी देण्याची राज्य सरकारकडे मागणी

■ **मुंबई**

कोरोनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या घरगुती काम करणाऱ्या कामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी घरगुती कामगार कल्याण मंडळाला राज्यसरकाने तात्काळ १०० कोटी रुपयांची मदत करून राज्यात बंद असलेली घरगुती कामगारांची नोंदणी पुन्हा सुरू करावी अशी मागणी आ. अतुल भातखळकर यांनी केली.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा सप्ताह' अभियानांतर्गत आ. अतुल भातखळकर यांच्या प्रयत्नाने घरकाम करणाऱ्या महिलांना कोरोना नंतर उद्भवलेलेल्या परिस्थितीत अधिक नेटकेपणाने आणि जलदगतीने घरकाम करण्याचे एका आठवड्याचे मोफत ऑनलाइन प्रशिक्षण व पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज वाटप कार्यक्रमाचे उद्घाटन आज कांदिवली पूर्व विधानसभेचे आ. अतुल भातखळकर व जनकल्याण सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोष केळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कोरोना नंतर उद्भवलेल्या परिस्थितीत घरेलू काम करणाऱ्या महिलांना नव्या सुरुवातीसाठी सज्ज करण्याच्या हेतूने कांदिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार अतुल भातखळकर यांच्या प्रयत्नाने व प्रथम एज्युकेशन फौंडेशन यांच्या सहकार्याने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह, कांदिवली पूर्व येथे आठ दिवसांच्या मोफत ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाची आज सुरुवात झाली. यात १४० महिलांनी सहभाग घेतला असून त्यांना कोरोनासह जगताना स्वत:च्या तसेच इतरांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यायची, चेहऱ्यावर कोणते मास्क असावे, त्याचा वापर कसा करावा, सॅनिटायझर नियमित कसे वापरावे, सुरक्षित अंतरावर राहून कामे कशी करावीत, कामे अधिक जलद गतीने कशी करावीत, इलेक्ट्रॉनिक उपकरणे कशी हाताळावी, संभाषण कौशल्य कसे असावे, घरात येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांचे आदरातिथ्य कसे करावे, आदी महत्वपूर्ण बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

याच कार्यक्रमात प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत जनकल्याण सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोष केळकर यांच्या उपस्थितीत केवळ ४त्न टक्के व्याजदरावर १० हजार रुपये कर्ज वाटप कार्यक्रमाची सुद्धा सुरुवात करण्यात आली असून, या अंतर्गत आज १७५ महिलांनी नोंदणी केली असून, त्यांना लवकरच कर्जाचे वाटप केले जाणार आहे.

# बसवाहकाचे काम देण्याचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

■ **वसई**

राज्य परिवहन महामंडळात (एसटी) बसवाहकाचे काम देण्याचे आमिष दाखवून एका ३० वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याची घटना वसईत उघडकीस आली आहे. याप्रकरणी वालीव पोलिसांनी आरोपी मिलिंद अनिल झडे याला अटक केली आहे.

पीडित ३० वर्षीय तरुणी ही जव्हार तालुक्यात राहते.ती एका प्रसिद्ध कंपनीत काम करते. तिची ओळख सातिवली येथे राहणाऱ्या मिलिंद अनिल झडे तरुणाशी झाली. या तरुणाने तिचा विश्वास संपादन करून तिला राज्य परिवहन महामंडळात (एसटी) महिला बसवाहक म्हणून नोकरीला लावण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर नोव्हेंबर २०१९ ते जून २०२० या काळात तिला वारंवार सातिवली येथील घरी येण्यास भाग पाडले आणि तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मात्र तो नोकरी लावत नसल्याचे तिच्या लक्षात आले. याबाबत तिने जाब विचारला असता आरोपी तरुणाने तिची नकळत काढलेली अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी दिली. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने शनिवारी वालीव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तिने दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# वसईतील इंग्रजी माध्यम शाळांचा फी वसुलीसाठी तगादा कायम

## शाळेय फी संदर्भात मार्गदर्शक तत्व जाहीर करा - आमदार हितेंद्र ठाकूर

**सुधीर भोईर**

■ **वसई**

लॉकडाऊन काळात कामधंदे, रोजगार, नोकऱ्या हातातून गेलेल्या सर्वसामान्य नागरिकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना वसईतील काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी मात्र फी वसुलीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांकडे तगादा लावला आहे.

लॉकडाऊन काळात आर्थिकदृष्ट्या हतबल झालेल्या पालकांकडे फीसाठी तगादा लावणाऱ्या शाळांनी शैक्षणिक शुल्क आकारणीबाबत न पटणारे मुद्दे समोर ठेवून तथा पालकांना बँकेचे पासबूक पत्राची प्रत पाठवून त्यावरील खात्यावर टर्म फी, संगणक फी, ट्यूशन फी यासाठीची फी जमा करण्याच्या सूचना केल्या आहेत. सध्या शाळा बंद आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन धडे त्यांना दिले आहेत. मात्र अर्ध्या किंवा तासभराच्या ऑनलाईन शिक्षणासाठी सर्वसामान्य पालकांना ट्यूशन, टर्म, संगणक फी याकरिता गेल्यावर्षी विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्काइतकेच शुल्क आकारण्यात आले आहे.

याबाबत पालकांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त करत समाधान फाऊंडेशन या संस्थेकडे तक्रार केली. संस्थेच्या सदस्यांनी तात्काळ पंचायत समिती येथे धाव घेऊन शिक्षणाधिकारी माधवी तांडेल यांच्याशी चर्चा करून त्यांना पालकांकडून शाळांनी अर्धे शैक्षणिक शुल्क आकारण्याबाबत निवेदन सादर केले.

ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांना शिकवलेल्या धड्यांचेच निट आकलन होत नाही. अशी पालकांची ओरड आहे.

त्यात ऑनलाईन शिक्षणामुळे बऱ्याचशा पालकांना आपल्या विद्यार्थ्यांना नवीन मोबाईल विकत घेऊन द्यावे लागले. त्याचा त्यांना आधीच आर्थिक भुर्दंड सोसावा लागला आहे. बरेचसे पालक रिक्षाचालक, हॉटेलचालक, कंपनीत काम करणारे आहेत. तसेच मिळेल ती कामे करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भरणारे पालक वर्ग सध्याच्या लॉकडाऊन काळात आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आले आहेत. मात्र शाळा व्यवस्थापने संवेदनाशून्य कारभार राबवून आर्थिक कोंडीत सापडलेल्या पालकवर्गाचे फि वसुलीसाठी शोषण करत असल्याचा संताप पालक वर्गातून व्यक्त होतोय. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जोवर लस विकसति होत नाही तोवर शाळा, महाविद्यालये सुरू होणे कठीण आहे. अशाप्रसंगी शाळांनी हतबल पालकवर्गाला बँकेचे पासबुक पाठवून त्यामाध्यमातून आर्थिक वसुलीसाठी तगादा लावला आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी शाळेत जाणाऱ्या पालकांना शाळेत प्रवेश नाकारला जातो.

गोरगरीब पालकांनी हाताला काम नसल्याने ही फि भरायची कशी? हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर उभा राहीला आहे. याबाबत वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी फी वसुलीसंदर्भात मार्गदर्शक तत्वे जाहीर करून लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या सामान्य पालकवर्गाला फी वसुलीच्या तगाद्यातून मुक्ती देण्याची मागणी शासनाकडे केली आहे.

# सुधारित सुरक्षेसाठी 'झूम' तर्फे टु-फॅक्टर प्रमाणीकरणची घोषणा

■ **मुंबई**

झूम व्हिडिओ कम्युनिकेशन्स, व्हिडिओ-फर्स्ट युनिफाईड कम्युनिकेशन्सच्या अग्रणी प्रदात्याने त्यांच्या सुधारित टु-फॅक्टर प्रमाणीकरण (२एफए)ची घोषणा केली आहे, जो ॲडमिन आणि संघटनांना त्यांच्या वापरकर्त्यांचे संरक्षण करणे सोपे बनवते आणि प्लॅटफॉर्मवरूनचे सुरक्षेच्या केल्या जाणाऱ्या उल्लंघनांना प्रतिबंध करते. टु-फॅक्टर प्रमाणीकरण ऑनलाईन वापरकर्त्यांना दोन किंवा अधिक पुरावे किंवा क्रेडेंशिअल्स सादर करण्याचे सांगते, जे वापरकर्त्याला माहित आहे असे काहीतरी (पासवर्ड किंवा पिन), काहीतरी जे वापरकर्त्याच्या मालकिचे आहे (स्मार्ट कार्ड किंवा मोबाईल डिव्हाइस), किंवा काहीतरी जे वापरकर्त्याकडे असते (फिंगरप्रिंट्स, आवाज) याद्वारे त्यांच्या अकाउंटच्या मालकीचे प्रमाणीकरण करून त्यांना ओळखते. झूम २एफए त्यांच्या युनिफाईड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्मच्या आत वापकर्त्यांची पडताळणी करण्याची सुरक्षित पध्दत पुरवतो. २एफए संघटना कर्मचारी किंवा विद्यार्थ्यांच्यया डिव्हाइसेसना पासवर्डचा अंदाज लावून किंवा प्रवेश मिळवून अकाउंटमध्ये प्रवेश मिळवण्यापासून वाईट लोकांना प्रतिबंध करेल असा सुरक्षेचा अतिरिक्त स्तर समाविष्ट करून ओळखीची चोरी आणि सुरक्षेचे उल्लंघन यांची जोखीम कमी करू शकतात. २एफए ची अंमलबजावणी केल्यामुळे संघटनांना संवेदनशील माहिती आणि ग्राहक माहितीच्या अनुपालनाची जबाबदारी पूर्ण करण्यास मदत होते. लहान व्यवसायांसाठी आणि शाळांसाठी, एसएसओ सेवांसाठी प्रदान करणे खर्चिक ठरू शकते. झूम २एफए वापरकर्त्यांची पडताळणी करणे आणि सुरक्षा उल्लंघनांविरुद्ध संरक्षण करण्यासाठी मोफत आणि प्रभावी पध्दत पुरवतो. २एफए सुरक्षेचा अतिरिक्त स्तर पुरवतो ज्यामुळे सतत पासवर्डचे व्यवस्थापन करण्यापासून वापरकर्त्यांची काळजी घेतो आणि सुरक्षेच्या होणाऱ्या उल्लंघनाविरुद्ध संरक्षण करतो आणि यांसारखे अनेक लाभ पुरवतो.

# शिक्षक अद्याप पेपर तपासणीच्या मानधनाच्या प्रतीक्षेत

■ **मुंबई,प्रतिनिधी**

बोर्ड परीक्षा १०वीचा निकाल २९ जुलै रोजी जाहीर झाला. मात्र परीक्षक/नियामक यांना पेपर तपासणीचे मानधन अद्याप बोर्डाकडून मिळालेले नाही. कोरोनाच्या संकटात लॉकडाउनच्या परिस्थितीत आपल्या जीवाची पर्वा न करता दिलेल्या निर्देशानुसार काम पूर्ण करून सहकार्य केल्यामुळेच बोर्डाला निकाल वेळेत देणे शक्य झाले. ह्या शिक्षकाना उत्तर पत्रिका शाळातून घरी व नियामककडे जमा करायला नेणे - घेणे यासाठी मोठा त्रास सहन करावा लागला. रेल्वे सेवा बंद असल्याने व सार्वजनिक बस मध्ये प्रवेश अनुमती नसल्याने खाजगी वाहनांच्या प्रवासासाठी स्वत:च्या खिशातून त्यांना खर्च करावा लागला. प्रत्येक शिक्षकाला ५०० ते ८०० रुपये जास्त खर्च करावे लागले आहे.ही बाब लक्षात घेऊन बोर्डाने पेपर तपासणीच्या मानधनाबरोबर प्रवास भत्त्याच्या रकमेत ही वाढ करून द्यावी. अशी मागणी टीचर्स डेमोक्रॅटिक फ्रंट चे उपाध्यक्ष राजेश पंड्या यांनी केली आहे. प्रत्येक वर्षी परीक्षकाना आपल्या नियामकाकडे ४ ते ५ वेळा जावे लागते त्याचा प्रवास भत्ता फक्त २०० रु.दिला जातो.तो फार कमी आहे. नियामकाना ही १२०० ते १५०० पेपर तपासणीचे मानधन मिळते. पण तेही कमी आहे.त्यांच्याही एकुण रकमेत वाढ करण्यात यावी. झालेला जास्त खर्च लक्षात घेऊन बोर्डाने सहानुभूती पूर्वक न्याय करावा, अशी मागणीही राजेश पंड्या यांनी केली आहे.

# रेल्वेगाडीच्या धडकेत महिलेचा मृत्यू

■ **वसई**

पश्चिम रेल्वेच्या विरार ते वैतरणा रेल्वे स्थानकादरम्यान भरधाव अज्ञात रेल्वेगाडीच्या धडकेत एका ३५ ते ४० वयोगटातील महिलेचा मृत्यू झाला आहे. सदर महिलेची अद्याप ओळख पटलेली नसून रेल्वे पोलीस तिच्या वारसांचा शोध घेत आहेत. तिच्या अंगात लाल रंगाचा त्यावर फुलांची नक्षी असलेली मॅक्सी. त्याच्या आत काळ्या रंगाचा गोल गळ्याचा टी शर्ट नेसणीस आहे. या महिलेबाबत कुणाला काही माहिती असल्यास त्यांनी वसई रोड रेल्वे पोलीस ठाण्याच्या ०२२६७६३८०१६ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**REMSONS Industries Limited**

Where Creation is the Culture

सीआयएनः एल५१९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
नोंदणी. कार्यालयः ४ था मजला, ग्लडोलिया, हनुमान रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५७
दूर क्र : ०२२-२६११३८८३; ०२२ २६१२२३६८,
ई-मेल आयडीः corporate@remsonscom
संकेतस्थळः www.remsons.com

**३० जून २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

रु. लाखामध्ये (ईपीएस वगळता)

| तपशिल | संपलेले त्रैमासिक (अलेखापरीक्षित) ३०.०६.२०२० | संपलेले त्रैमासिक (अलेखापरीक्षित) ३०.०६.२०१९ | संपलेले वर्ष (लेखापरीक्षित) ३१.०३.२०२० |
|---|---|---|---|
| **कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ)** | **१,३१४.०८** | **३,६३२.९२** | **७४१.२४** |
| सामान्य कार्यामधून कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपूर्व निव्वळ नफा/ (तोटा) | (३०७.१७) | १२३.९९ | ७४१.२४ |
| सामान्य कार्यामधून कर पूर्व, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबीं पश्चात निव्वळ नफा/ (तोटा) | (३०७.१७) | १२३.९९ | ७४१.२४ |
| कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपश्चात) | (२२२.६४) | ८८.४५ | ५३३.६६ |
| "कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि सर्वकष उत्पन्न (कर पश्चात)]" | (२२३.३३) | ८१.६१ | ५०६.६६ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (रु. १०/- प्रत्यकी दर्शनी मूल्याचे) | ५७१.३४ | ५७१.३४ | ५७१.३४ |
| राखीव (गत हिशोबाच्या वर्षामधील ताळेबंदाच्या अनुसार पुनर्मुल्याकीत राखीव वगळता राखीव) | ३१ मार्च २०२० अनुसार | | १,९०२.६९ |
| प्रती भाग उत्पन्न (रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | | | |
| १. मूळः (रु.) | (३.९०) | १.५५ | ९.३४ |
| २. सौम्यिकृतः (रु.) | (३.९०) | १.५५ | ९.३४ |

टिपाः
१. वित्तिय निष्कर्षाचे लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाने १५ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये ते संमत करण्यात आले आहे. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ आणि अन्य मान्यताप्राप्त अकाऊंटिंग प्रमाण आणि धोरणांच्या अंतर्गत विहित करण्यात आल्या नुसार भारतीय लेखा प्रमाण (इंड एएस) च्या मान्यतेच्या अनुसार वित्तिय निष्कर्ष तयार करण्यात आले आहे.
२. सेबी (लिस्टिंग ऑब्लिईगेशनॲण्डडिसक्लोझर रिक्वायरमेंट रेग्युलेशन) नियमावली, २०१५ च्या ३३ च्या अनुषंगाने स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करावयाच्या ३० जून २०२० च्या त्रैमासिकासाठीचा वित्तीय निष्कर्षाचा उपरोक्त हा सविस्तर आराखडा आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षा चा पूर्ण आराखडा कंपनीच्या www.remsons.com वर आणि बीएसई लि. च्या म्हणजेच www.bseindia.com आणि नशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाच्या www.nseindia.com ह्या संकेतस्थळावर आणि देखील उपलब्ध आहे.

रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करीता

ठिकाणः मुंबई
दिनांकः १५ सप्टेंबर २०२०

सही/-
कृष्ण केजरीवाल
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

**झेनिथ स्टील पाईप्स ॲंड इंडस्ट्रीज लिमिटेड**
(पूर्वी झेनिथ बिर्ला (इंडिया) लिमिटेड म्हणून ज्ञात)
**सीआयएनः** एल२९२२०एमएच१९६०पीएलसी०११७७३
**नोंदणी कार्यालयः** ५ वा मजला, इंडस्ट्री हाऊस, १५९, चर्चगेट रेक्लमेशन, मुंबई - ४०००२०.
**दूर. क्र.:** ०२२-६६६१६८४००, **फॅक्सः** ०२२-२२०४७८३५ **ई-मेलः** zenith@zenithsteelpipes.com; **संकेतस्थळः** www.zenithsteelpipes.com

**३० जून रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

(रु. लाखांमध्ये, प्रती समभाग माहिती वगळता)

| अनु. क्र. | तपशिल | एकमेव | | | | एकत्रिकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले त्रैमासिक | | संपलेले वर्ष | | संपलेले त्रैमासिक | | संपलेले वर्ष | |
| | | ३०.०६.२०२० | ३१.०३.२०२० | ३०.०६.२०१९ | ३१.०३.२०२० | ३०.०६.२०२० | ३१.०३.२०२० | ३०.०६.२०१९ | ३१.०३.२०२० |
| | | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न | १०१७ | २१२७ | २३१६ | ६९२६ | १४५५ | ३१४९ | २७२० | ११५२१ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबीपूर्व) | (५०६) | (२१२६) | (३१६) | (२७९८) | (५३९) | (२१६४) | (३७०) | (२८३४) |
| ३ | कालावधीसाठी कर पूर्व निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पश्चात) | (५०६) | (२१०७) | (३१६) | (२७९८) | (५३९) | (२१४५) | (३७०) | (२८३४) |
| ४ | कालावधीसाठी कर पश्चात निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पश्चात) | (५०६) | (२१०७) | (३१६) | (२७९८) | (५३९) | (२१४५) | (३७०) | (२८३४) |
| ५ | कालावधीसाठी एकुण सर्वकष उत्पन्न (कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य सर्वकष उत्पन्न (कर पश्चात) | (५०६) | (२०१८) | (३१६) | (२७९९) | (५३९) | (२१४६) | (३७०) | (२८३५) |
| ६ | समभाग भांडवल | १३१२८ | १३१२८ | १३१२८ | १३१२८ | १३१२८ | १३१२८ | १३१२८ | १३१२८ |
| ७ | राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) (गत कालावधीच्या लेखापरीक्षित ताळेबदामध्ये दाखविल्या प्रमाणे | | | | (३७१७०) | | | | (३८२५३) |
| ८ | प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीपूर्व) (प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | | | | | | | | |
| | मूळ | (०.३९) | (१.६२) | (०.२४) | (२.१३) | (०.४१) | (१.६५) | (०.२८) | (२.१६) |
| | सौम्यीकृत | (०.३९) | (१.६२) | (०.२४) | (२.१३) | (०.४१) | (१.६५) | (०.२८) | (२.१६) |
| ९ | प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीपूर्व) (प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | | | | | | | | |
| | मूळ | (०.३९) | (१.६२) | (०.२४) | (२.१३) | (०.४१) | (१.६५) | (०.२८) | (२.१६) |
| | सौम्यीकृत | (०.३९) | (१.६२) | (०.२४) | (२.१३) | (०.४१) | (१.६५) | (०.२८) | (२.१६) |

टिपाः
१. उपरोक्त निष्कर्ष हे सेबी (लिस्टिंग ॲंड ऑब्लिगेशन डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये सादर करावयाच्या ३० जून २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षांच्या तपशिलवार नमुन्याचा आराखडा आहे. त्रैमासिकाच्या निष्कर्षाचा पूर्ण नमूना स्टॉक एक्स्चेंजच्या (www.bseindia.com आणि कंपनीच्या (www.zenithsteelpipes.com) वर उपलब्ध आहे.
२. सेबी (लिस्टिंग ॲंड ऑब्लिगेशन डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली, २०१५ च्या नियम ३३ च्या आवश्यकतांच्या पूर्ततेच्या अनुसार ३० जून २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी कंपनीच्या एकमेव आणि एकत्रिकृत वित्तिय निष्कर्षांचे संवैधानिक लेखापरीक्षण समितीकडून समीक्षण करण्यात आले आहे आणि त्यावर आधारीत बदलेला अहवाल सादर करण्यात आला आहे.

संचालक मंडळाच्या वतीने आणि करीता
मीनल पोटे
पूर्ण वेळ संचालक
डीआयएनः ०७१६३५३९

दिनांकः १४ सप्टेंबर २०२०
ठिकाणः मुंबई